**वाळू/रेती लिलावाच्या करारनाम्यावर मुद्रांक शुल्क आकारणे**

**महाराष्ट्र शासन**
**महसूल व वन विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः गौखनि-१०/०३१६/प्र.क्र.२४८/ख**
हुतात्मा राजगुरु चौक
मादाम कामा मार्ग, मंत्रालय मुंबई-३२
दिनांक : १८ मार्च, २०१७

**वाचा :-** १) शासन निर्णय महसूल व वन विभाग, क्र. : गौखनि १०/०५१२/ प्र.क्र.३००/ख, दिनांक : १२ मार्च, २०१३

२) शासन निर्णय महसूल व वन विभाग, क्र. : गौखनि १०/१०१४/प्र.क्र.५००/ख, दिनांक : २१ मे, २०१५

**प्रस्तावना:-**

संदर्भाधीन क्रमांक १ येथील दिनांक १२ मार्च, २०१३ च्या शासन निर्णयाद्वारे वाळू/रेती निर्गती विषयी सुधारित धोरण विहित करण्यात आले आहे. तसेच संदर्भाधीन क्रमांक २ येथील दिनांक २१ मे, २०१५ च्या शासन निर्णयाद्वारे सागरी किनारपट्टी विनियमन क्षेत्रातून नौकानयन मार्ग सुकर करण्यासाठी वाळू/रेती निर्गती विषयी धोरण विहित करण्यात आले आहे. या दोनही शासन निर्णयांमध्ये यशस्वी लिलावधारकाने लिलावाची ¾ रक्कम विहित मुदतीत भरण्याचे हमीपत्र देण्याची तरतुद करण्यात आली असून, असे हमीपत्र रू.१००/- च्या मुद्रांकावर घेण्याची तरतुद करण्यात आली आहे. मात्र, यशस्वी लिलावधारकाने लिलावाची १०० टक्के रक्कम भरल्यानंतर जिल्हाधिकारी व यशस्वी लिलावधारक यांच्या दरम्यान करावयाचा करारनामा किती रकमेच्या मुद्रांकावर करावा याबाबतची स्पष्टता संदर्भाधीन शासन निर्णयात करण्यात आली नव्हती. महाराष्ट्र मुद्रांक अधिनियमाच्या तरतुदीनुसार असा करारनामा यथायोग्य मुद्रांकित असणे गरजेचे असल्याने वाळू/रेती लिलावाच्या अनुषंगाने यशस्वी लिलावधारकासोबत करण्यात येणाऱ्या करारनाम्यावर विहित दराने मुद्रांक शुल्क आकारण्याबाबत निर्देश देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय:-**

राज्य शासनाच्या प्रचलित वाळू / रेती निर्गती धोरणामधील तरतूदीनुसार करण्यात येणाऱ्या वाळू/रेतीच्या लिलावाच्या अनुषंगाने यशस्वी लिलावधारकासोबत करण्यात येणाऱ्या करारनाम्यावर महाराष्ट्र मुद्रांक अधिनियमाच्या तरतूदीप्रमाणे खालील दराने मुद्रांक शुल्क आकारण्यात यावे असे याद्वारे सर्व संबंधितांना निर्देशित करण्यात येत आहे :-

(अ) लिलावाची रक्कम रु. १० लाखापर्यंत असल्यास लिलावाच्या रकमेच्या ०.१ टक्का किंवा रु. १००/- यापैकी जे अधिक असेल तेवढे मुद्रांक शुल्क.

(ब) लिलावाची रक्कम रु. १० लाखपेक्षा जास्त असल्यास लिलावाच्या रकमेवर ०.२ टक्के मुद्रांक शुल्क.

२. वरीलप्रमाणे करारनाम्यावरील मुद्रांक शुल्काची रक्कम संबंधित लिलावधारक यांनी भरावयाची आहे.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१७०३१८१८५९१३८६१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Rajendra Kshirsagar

Digitally signed by Rajendra Kshirsagar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Revenue And Forest Dept, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=3e673df1a1f6243d932fcb8679fc8cd85d90c61495ae8b4592f8dcc5b8a851a8, cn=Rajendra Kshirsagar
Date: 2017.03.18 19:00:29 +05'30'

**(राजेंद्र क्षीरसागर)**
शासनाचे उप सचिव

**प्रत,**

१) मा.राज्यपाल यांचे सचिव, राजभवन मलबार हिल मुंबई.
२) मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
३) मा. मंत्री (महसूल) महाराष्ट्र राज्य यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
४) मा. राज्यमंत्री (महसूल) महाराष्ट्र राज्य यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
५) सर्व मा.मंत्री/मा.राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
६) सर्व मंत्रालयीन विभाग.
७) सर्व विभागीय आयुक्त.
८) सर्व जिल्हाधिकारी.
९) सर्व उपविभागीय अधिकारी.
१०) सर्व तहसिलदार.
११) संचालक, भूविज्ञान व खनिकर्म संचालनालय, नागपूर.
१२) संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
१३) प्रधान मुख्य वन संरक्षक, नागपूर.
१४) महालेखापाल-१, महाराष्ट्र राज्य (लेखा व अनुज्ञेयता), (लेखापरिक्षा), मुंबई.
१५) महालेखापाल-२, महाराष्ट्र राज्य (लेखा व अनुज्ञेयता), (लेखापरिक्षा), नागपूर.
१६) सर्व कार्यासन, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
१७) निवडनस्ती "ख" कार्यासन, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुबई ४०० ०३२.